Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील उपेक्षित व्यक्तिचित्रणे

**प्रा. डॉ. पंडित गंगाधरराव रानमाळ**
अंकुशराव टोपे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
जालना

अण्णाभाऊंचा जन्म ज्याचे अस्तित्वच नाकारण्यात आले अशा मांग जमातीत झाला. गुन्हेगार म्हणुन जन्मताच ठपका ठेवण्यात आलेली उपेक्षित अशी जमात जीवनात सतत जगण्यातील होरपळ त्यांच्या वाट्याला आली. बालपणातच शाळेत अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागल्याने अण्णाभाऊंचे शिक्षण असे झालेच नाही.

अण्णाभाऊंचा जन्म वाटेगाव येथे 1 ऑगस्ट 1920 रोजी झाला. लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार म्हणून अण्णाभाऊ मराठी साहित्यात सर्वत्र परिचित आहेत. अण्णाभाऊ पहिल्यांदा शाहीर म्हणुन उजेडात आले. नव्या युगाचा 'तमासगीर म्हणून प्रसिध्द पावलेल्या अण्णाभाऊंच्या शाहिरीने उपेक्षित जीवनाचा तळ गाठला. अण्णाभाऊ मुंबईच्या बकाल वस्तीतून फिरले तेथील जीवन उपभोगले, जे जीवन जगले, जे अनुभवले पाहिले तेच मी आता लिहित आहे. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही असे अण्णाभाऊ सांगतात. आपल्या जगण्यातला सारा दाहक अनुभव गाठीशी घेऊन त्यांनी कथा व कादंबऱ्या लिहिल्या त्या दलित अनुभवांच्या ज्वलंत प्रतिक ठरल्या आहेत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी तळागाळातील उपेक्षित लोकांचे जीवन चित्रण त्यांच्या कथा कादंबन्यातून अत्यंत प्रभावीपणे रेखाटले आहे. अशा लोकांसंबंधी वाटणारे ममत्व, त्या जीवनाचे प्रत्यक्ष घडलेले दर्शन त्या उपेक्षित जीवनाबाबतचा आंतरिक जिव्हाळा या बळावर त्यांनी अशा लोकांचे जसे जीवनदर्शन घडविले तसेच मराठी वाङ्मयात इतर कुणालाही ही किमया करता आलेली नाही.

अण्णाभाऊंचा 'खुळवाडी' हा 1957 मील पहिला कथासंग्रह त्यानंत बरबाद्या कंजारी, आबी, लाडी, फरारी, कृष्णाकाठच्या कथा, भानामती, गजाआड, चिरागनगरची भुतं. काडतूस, गुन्हाळ इ. अनेक कथासंग्रह एकापाठोपाठ निघाले. अण्णाभाऊंच्या बहुतेक कथांमधून मुंबईच्या बकालवस्तीत जगणाऱ्या माणसाच्या कथा आहेत. जीवन संघर्षात डुबलेली तसेच समाज व्यवस्थेने पिळलेली उपेक्षित माणसाची ती कथा आहे. समाजव्यवस्थेमध्ये निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक विषमतेविरुध्द कथेतील नायक संघर्ष करताना अण्णाभाऊंनी कथेत साकारली आहेत. अण्णाभाऊंच्या कथेतील माणसे भूके' साठी संघर्ष करतात.

अण्णाभाऊंच्या स्मशानातील सोनं, कोंबडीचोर, थडग्यातील माणसं, बरबाद्या कंजारी, रामोशी, भोमक्या, विष्णुपंत कुलकर्णी यासारख्या कथामधून उपेक्षित, दलित माणसांच्या व्यथा विद्रोहासह व्यक्त झालेल्या आहेत.

'स्मशानातील सोनं' या कथेतील भीमा हा जगण्याचे सर्व मार्ग बंद झाल्यामुळे थडगे उकरून मढ्यावरील ओरबाडून आपली भूक भागवतो. एक दिवस मात्र प्रेत उकरतांना त्याच्यावर खूप मोठा प्रसंग गुदरतो. प्रेताच्या तोंडातील सोन काढण्यासाठी जेव्हा तो आपला हात प्रेताच्या तोंडात घालतो त्यावेळी कोल्हे त्याच्यावर तूटून पडतात आणि त्याच्या दुर्दैवाने गावातील लोकही हातात कंदील घेऊन स्मशानाकडे येताना त्याला दिसतात त्यावेळी आपला जीव वाचविण्यासाठी प्रेताच्या तोंडावर तो प्रहार करतो आणि आपला हात सोडवून घेतो पण प्रेताच्या तोंडात त्याच्या हाताची पाच बोटे तुटतात तो आपला जीव घेऊन पळत सुटतो. दुसऱ्या दिवशी पुन्हा खाणीचे काम सुरु होते पण हाताची बोटेच गेल्यामुळे तो असहाय्य बनतो. पोटाची भूक भागविण्यासाठी माणूस किती असहाय्य बनतो. वाटेल ते कृत्य करण्यास मागेपुढे पाहात नाही. याचे वास्तवचित्र अण्णाभाऊ साठे यांनी स्मशानातील सोनं' या कथेत रेखाटले आहे. या कथेतून अण्णाभाऊंनी विषम सामाजिक परिस्थितीचे व तिच्या विरुप शक्तीचे प्रतिबिंब उमटविले.

अशाच पोटासाठी अन्नान्न दशा झालेली व त्यासाठी संघर्ष करणारी माणसे आण्णाभाऊच्या अनेक कथेत येतात मालकाचा जाच, अन्याय व शिव्या सहन करुनही पोटासाठी लाचार बनलेल्या परिस्थितीचा शिकार झालेल्या गंगाराम शिकार कथेत भेटतो. कोंबड्या चोरुन जगण्याचा कसाबसा प्रयत्न करणारा रामू कोंबडी चोर' कथेत आहे. मला घर नाही, शेत नाही, अन्न पुढं आणि मी त्याच्या मागे धावतो आहे तर चोरी करु नको तर काय करू? असा प्रश्न तो मांडतो. थडग्यातील हार्ड' या कथेत भुकेन व्याकुळ झालेली गावकऱ्यांच्या उष्ट्या खरकट्यासाठी अंगणात ताटकळत बसलेली म्हारमांग अण्णाभाऊंच्या कथेतून येतात. या सारख्या कथांतून सामाजिक विषमता किती भयानक आहे याचा प्रत्यय येतो. अण्णाभाऊंच्या कथा दैन्य, दारिद्य, दुरावस्था यांनी जागोजागी मोडून पडलेल्या माणसाच्या 'भुके' च्या निदर्शक कथा आहेत.

'रामोशी' या कथेमध्ये प्रामाणिकपणे काम करुनही योग्य वागणुक दिली जात नाही. त्यांच्यावर अन्याय अत्याचार होतो. याचे चित्रण येते. या कथेतील नायक यदू रामोशी हा प्रामाणिकपणे गावाची राखण करतो. त्याचे फळ मात्र त्याला त्याच्या मुलाचा खंडूचा खून आणि त्यांची पत्नी चिमाचा दुर्दैवी मृत्यू हेच मिळते. शेवटी सूडाच्या भावनेने बेभान झालेला यदू रामोशी डोंगऱ्याचा खून करतो. खेड्यातील दोन जमीनदारांच्या वादात बळी गेलेल्या एका दरिधी रामोशी कुटुंबाची शोकात्मिका अण्णाभाऊंनी चित्रित केली आहे.

'विष्णुपंत कुलकर्णी' ही दुष्काळग्रस्त परिस्थितीवर आधारलेली समर्थ कथा आण्णाभाऊंनी लिहिली या कथेत म्हारमांगाना चेतावणी देत विष्णुपंत सांगतात "कसंही करुन

जगा पण तुम्ही कुत्र्यासारखं मरु नका, उकिरड्याचा पांग फिटतो तुम्ही तर माणसं आहात" नंतर ही माणसं मठ लुटतात. अटक होतात तेव्हा प्रांतसाहेबांना विष्णुपंत सांगतात आम्ही कुत्र्यासारखं मरणारी माणसं नाहीत यातून त्यांचे बंडखोर व तेजस्वी मन व्यक्त होते.

थोडक्यात अण्णाभाऊंनी आपल्या कथेतून दलित माणसांचे सामाजिक मनच व्यक्त केले आहे. समाज व्यवस्थेने तुडविलेल्या, चुरडलेल्या उपेक्षित, वंचित माणसांबद्दल त्यांच्या मनात अपार करुणा प्रेम व तेवढीच सहानुभूती होती त्या माणसाची सृष्टी त्यांनी कथेतून मांडली. दलितांच्या वाट्याला आलेल्या दाहक वेदनामय जीवनाची कथा अण्णाभाऊंनी लिहीली त्यांच्या कथेतील माणसं बंडखोर आणि क्रांतीकारकही आहेत. त्यांची जीवन जगण्याची इच्छा तीव्र आहे. कारण जीवन जगण्यासाठी ते वाटेल ते करण्यास ते तयार आहेत. ओझी वाहण्यापासून ते कागदाचे तुकडे गोळा करण्यापर्यंत, झाडू मारण्यापर्यंतची कामे करुन ते पोट भरतात. प्रसंगी चोरी करणे, दरोडेही घालतात कारण पोटात असणारी भूक ही त्यांच्यापुढे जीवन मरणाचा प्रश्न बनून उभी राहते. भुकेची तीव्रता खूपच आहे. पण विशेष म्हणजे भुकेसाठी अण्णाभाऊंची माणसं मात्र लाचार होत नाहीत किंवा भुकेसाठी किंवा भुकेसाठी गुलामगिरी पत्करत नाहीत. पण ही परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत झालेल्या लोकांकडून ते हिसकावून घेतले पाहिजे ही न्यायाची नवी कल्पना अण्णाभाऊ साठेंच्या कथेतून येते. अण्णाभाऊंच्या कथेचे जग हे उपेक्षित माणसाचे आहे. अण्णाभाऊंची कथा उपेक्षिताची वेदना, भूक, अन्याय, त्यासाठी वाटेल तो संघर्ष करणारी माणसांचे जग चित्रित करते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. दलित साहित्याचा इतिहास प्राचार्य डॉ.म.सू.पगारे, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथम आवृत्ती 11 डिसेंबर 2005

2. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङमय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृत मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती 01 ऑगस्ट 1998

3. भारतीय साहित्याचे निर्माते अण्णाभाऊ साठे लेखक बजरंग कोरडे,प्रकाशक साहित्य अकादमी

4.प्र.आ.2001 3दलित साहित्य : उद्‌गम व विकास लेखक योगेंद्र मेश्राम, श्री मंगेश प्रकाशन नागपूर प्र.आ. 11 मे 1998